शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय, अनुदानित,
विनाअनुदानित, कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी सन २०१९-२० मध्ये करणेबाबत विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा. क्र. विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/३७०४ दिनांक ०६/०९/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 393
दि. 13 SEP 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

८१

# महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४
E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/3704 दिनांक :०६/०९/२०१९

प्रति,

१.कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,

२.प्राचार्य,शासकीय,अशासकीय,अनुदानित,विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

**विषय:- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी सन २०१९-२०मध्ये करणेबाबत.**

**संदर्भ :- संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०५०२/दि.२०/८/२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाडीबीटी पोर्टल मधील शिष्यवृत्ती अर्ज विद्यार्थ्यांना भरण्यास **१ ऑगस्ट २०१९** पासून सुरूवात झाली आहे तसेच आपल्या महाविद्यालयाची फी या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करून देण्यात आली आहे. तथापि अजुनही महाविद्यालयाचे म्हणावे तसे विद्यार्थ्यांचे अर्ज भरले जात नाहीत.तथापि आर्थिक वर्षाचा अनुभव पाहता आपल्या ॲडमिशनच्या वेळेसच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत सूचित केलेले आहे.त्यानुसार आपल्या महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असल्यामुळे आपण जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ द्यावयाचा आहे.तसेच याबाबत असणारे एका **प्राध्यापकाची नोडल अधिकारी** म्हणून नियुक्ती करावयाची आहे व विद्यार्थ्यांना फॉर्म भरून देण्यासाठी **कॉम्प्युटर,प्रिंटर,नेट,स्कॅनर** या सर्व सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांचे फॉर्म महाविद्यालयातच भरून घ्यावयाचे आहे.याची सुपुर्ण जबाबदारी संबंधीत **नोडल अधिकारी** यांच्याकडे द्यावयाची आहे व भरलेल्या विद्यार्थ्यांचे फॉर्म क्लर्क व प्रिन्सिपल लॉगीनमधून शासन निर्णयास अनुसरून योग्यरित्या तपासून **उत्पन्न दाखला,रहिवाशी दाखला,गुणपत्रिका,ॲडमिशन पावती,जातीचा दाखला अपत्याचे प्रमाणपत्र** या सर्व डाऊनलोड केलेली कागदपत्रे स्पष्टपणे दिसतील असेच फॉर्म **RO** लॉगिनवरती फॉरवर्ड करावयाचे आहेत. चुकीच्या पध्दतीने फॉर्म फॉरवर्ड केल्यास याबाबत आपल्याला नोटीस लागू करण्यात येईल व मा. विधानसभा

Scanned by CamScanner

आचारसंहिता,महसूल विभागाकडील संप,पुरस्थिती तसेच भविष्यात येणाऱ्या अडचणींचा विचार करून आपण योग्य नियोजन करून आपल्या महाविद्यालयातील शिष्यवृत्ती संबंधात असणारे अर्ज नोडल अधिकारी यांच्यामार्फत संनियंत्रण करून **दि.२० सप्टेंबर** अखेरीस या कार्यालयाकडे फॉरवर्ड होतील या दृष्टीने काटेकोरपणे नियोजन करण्यात यावे भविष्यात होणाऱ्या अडचणी येवू नये म्हणून आतापासून खबरदारी घेणे उचित होईल या संबंधीत असणाऱ्या तांत्रिक अडचणी **तात्काळ नोडल अधिकारी श्रीमती पी.एस.दीक्षीत** यांच्याकडे दुरध्वनीद्वारे संपर्क करून तात्काळ निराकरण करण्यात यावे.

6.9.19

**विभागीय सहसंचालक,**
**(उच्च शिक्षण)**
**कोल्हापूर विभाग,कोल्हापूर**

**सोबत- संचालनालयाकडील संदर्भिय पत्र**

Scanned by CamScanner